सकाळ
गुरुवार,
४ डिसेंबर २०१४

# शोधनिबंध स्पर्धेत प्रशांत गवसचे यश

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. ३ : मुंबई विद्यापीठातर्फे जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा नुकतीच देवगड येथील स. ह. केळकर महाविद्यालयात झाली. यात नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रशांत गवसने तिलारी पुनर्वसनग्रस्तांसमोरील समस्या या विषयावर संशोधन प्रकल्प सादर केला. विद्यापीठाने याची निवड उत्कृष्ट संशोधन प्रकल्पासाठी करून त्याचा गौरव केला.

हा प्रकल्प पनवेल येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी पात्र ठरविला आहे. तिलारी प्रकल्पाचा सर्वांगीण अभ्यास करतानाच, या प्रकल्पात बाधित झालेल्या पुनर्वसनग्रस्तांची सध्या काय स्थिती आहे? त्यांच्यासमोर कोणत्या समस्या आहेत? त्या सोडविण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत? यावर या प्रकल्पाद्वारे प्रकाश टाकण्यात आला आहे. एका ज्वलंत सामाजिक समस्येवर सशोधन केल्याबद्दल आविष्कारच्या तज्ज्ञांनी समाधान व्यक्त केले व या प्रकल्पाची एकमुखाने निवड केली. प्रा. डॉ. एस. यु. दरेकर यांनी प्रशांतला मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष श्रीपाद हळबे, संस्थेचे अध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील व सर्व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी यांनी प्रशांतचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.